निविदा (कोटेशन) मसुदा

डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली येथील प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, फळबाग संबंधित कामे व इतर कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरितादर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | | तपशील | दर (रु) |
|---|---|---|---|---|
| १ | गाय म्हैस बैल इत्यादी जनावरांची देखरेख (प्रक्षेत्रावर चारणे, चारा तयार करणे, चारा पाणी रात्री व दिवसा करणे व जनावरांची काळजी घेणे, गोठे साफसफाई) | | | |
| २ | गाय/म्हैस सकाळ व सायंकाळ दुध काढणे | | | |
| ३ | शेळी व मेंढी देखरेख ( प्रक्षेत्रावर चारणे चारा पाणी करणे निवारा साफसफाई करडांना दुध पाजणे व काळजी घेणे) | | | |
| ४ | कुक्कुटपालन देखरेख(दाना पाणी करणे, अंडी गोळा करणे, राखण करणे,कुक्कुटपालन व गृह साफसफाई, भांडे स्वच्छ करणे इ.) | | | |
| ५ | पिकातील विरळणी करणे | | प्रती हे. | |
| ६ | बियाणे टोकण करणे | | प्रती हे. | |
| ७ | पिकांना फळबागांना पाणी देणे | दांड पद्धत | प्रती हे. | |
| | | स्प्रिंकलर | | |
| ८ | पिकांची कापणी मळणी व गंजी लावणे | | प्रती हे. | |
| ९ | शेतातील धसकटे व काडीकचरा वेचणे | | प्रती हे. | |
| १० | पिकांचे,फळझाडांचे इ. संरक्षण करणे/ पहारेकरी | | | |
| ११ | पिकातील डवरणी व वखरणी करणे | | प्रती हे. | |
| १२ | पाठीवरच्या पंपाने फवारणी करणे | | प्रती हे. | |
| १३ | फळबाग निगडीत दैनंदिन कामे | | प्रती हे. | |
| १४ | शेतीशी निगडीत दैनंदिन कामे | | प्रती हे. | |
| १५ | भांडार विभागातील कामे | | | |
| १६ | उत्पादित मालाचे वजन करणे | | प्रती हे. | |
| १७ | उत्पादित माल दळणवळण करण्याकरिता मालाचे लोडिंग वअनलोडिंग | | प्रती हे. | |
| १८ | बीज प्रक्रिया केंद्राची कामे प्रक्रिया (टॅगींग,बॅगिंग) | | प्रती हे. | |
| १९ | धान रोपाच्या नर्सरी करिता धसकटे वेचणे जमिन भूसभूसित करणे, नर्सरी टाकणे | | प्रती हे. | |
| २० | धानाचे पऱ्हे काढणे, पऱ्हे पसरविणे व रोवणी करणे | | प्रती हे. | |
| २१ | धान पिकाचे पाणी व्यवस्थापन | | प्रती हे. | |
| २२ | धान पिकाची कापणी | | प्रती हे. | |
| २३ | धानाचे भारे बांधणे, वाहतुक करणे व गंजी रचणे | | प्रती हे. | |
| २४ | कम्बाईन हार्वेस्टरने धान पिकाची काढणी/मळणी करणे | | प्रती हे. | |
| २५ | थ्रेसर द्वारे मळणी करणे, पोते भरणे वजन करणे , शिलाई मारणे व गोडाऊनला आणून थप्पी मारणे | | प्रती हे. | |
| २६ | बियाण्याची साफसफाई, प्रतवारी करून बॅग भरणे शिलाई मारणे वजन करणे व कमी दर्जाचे धानाची थप्पी मारणे | | प्रती हे. | |
| २७ | धान बांधीत निंदण करणे | | प्रती हे. | |
| २८ | धानामधील भेसळ काढणे | | | |
| २९ | पेरणी यंत्रा द्वारे धान पेरणे | | प्रती हे. | |
| ३० | भारे बांधण्यासाठी जंगला मधुन सिंधी आणणे ठेचणे व बंध तयार करणे | | प्रती बंध | |
| ३१ | ट्रे मध्ये नर्सरी तयार करण्यासाठी माती व कम्पोस्ट खत आणून चाळणे व मशीन द्वारे ट्रे भरणे | | प्रती ट्रे | |
| ३२ | प्रक्षेत्रावरील रोवणी यंत्राद्वारे रोवणी करणे (गॅप भरणे, ट्रे उचलणे इ.) | | प्रती हे. | |

अटी व शर्ती:

१) निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.००ते दुपारी ५.३० यावेळेस स्वीकारल्या जातील.

२) निविदा कोटेशन वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, डॉ.पं.दे.कृ. विद्यापीठ अकोला अंतर्गत, कृषि विज्ञान केंद्र सोनापूर गडचिरोली यांचे नावाने सीलबंद लिफाफा मध्ये पाठवावी.

३) कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैद्य परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्यादेयकाचे१० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

५) कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बीजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

६) कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली कार्यालय अंतर्गत संपूर्ण प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असताना पिकांचे/फळबागांचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

७) प्रक्षेत्रावरील विभागावर बीजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करते वेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

८) विभागावर देण्यात आलेले बीजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९) विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

१०) कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

११) या कार्यालयातर्फे कंत्राटदारास बीजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही,बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२) कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१३) प्रक्षेत्रावरील विभागावर बीजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमासंरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४) प्रक्षेत्रावरील विभागांवर बीजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असताना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद-विवाद वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख , कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५) प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे ही एक वर्षांमधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर एक वर्षाकरिता वैध राहतील.

१६) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारांची असल्याचे रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७) निविदा/ कोटेशन मधील संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाने सर्व करांसहितनमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील. करा संबंधित कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१८) निविदाचा काही भाग किंवा संपूर्ण निविदा स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.

१९) कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

२०) कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामेतसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे संबंधित तांत्रिक कामाची पदविका/ आयटीआय प्रमाणपत्र/वाहन चालविण्याचा परवाना व कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२१ पुरवठा धाराकाचे मजूर पूर्णतः कंत्राटी पद्धतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

२२) कामाच्या आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध करून द्यावे लागतील.

२३) मजुरांची कामाची वेळ ही आठ तास ठरवून दिल्या प्रमाणे राहील.

२४) सदर संस्था / कंपनी / ठेकेदार असमाधानकारक काम करत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्याकडे असतील.

२५) सदर बाबतचे देयक सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

२६) वरीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशीला नुसार दि.१५/०१/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निवीदा सीलबंद लिफाफा मध्ये सादर करावी.

वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोली